दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.२६ फेब्रुवारी २०२६ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १८२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi ● Thruday 26 Feburary 2026 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 182 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## तिजोरी रिकामी असताना टेंडरचा सुळसुळाट का?

**मुंबई**–एकीकडे शिवभोजन आणि इतर योजना बंद पाडायच्या आणि दुसरीकडे केवळ घोषणांचा पाऊस पाडून जनतेची दिशाभूल करायची, हेच या सरकारचे धोरण आहे, अशा शब्दांत उबाठा गटाचे आमदार सचिन अहिर यांनी महायुती सरकारवर हल्लाबोल केला.सचिन अहिर म्हणाले की, राज्याची ७७ हजार कोटींची कंत्राटदारांची देणी थकलेली असताना नवीन टेंडर कोणासाठी काढले जात आहेत, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. या योजनांची सरसकट घोषणा करण्यात आली त्यासंदर्भात काहीही विचार करण्यात आला नाही, त्यामुळे तीर्थदर्शन योजना, पुजाऱ्यांना मानधन योजना, देवळांना अनुदान देण्याची योजना बंद पडल्या आहेत.सचिन अहिर म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री सर्वांनाच क्लीनचीट देत बसलेले आहेत. चौकशी अहवाल आलेला नसताना मुख्यमंत्री यांचे नाव नाही, याचे आहे असे सांगतात, यामध्ये चौकशी झाली पाहिजे.

# मंत्र्यांनी लक्षवेधीवर बोलताना अभ्यास करून यावे

## नुसते बघतो, बैठक लावतो, असे म्हणून चालत नाही; मुनगंटीवारांनी उडवली मंत्र्यांची भंबेरी

### ..अन् सुधीर मुनगंटीवार यांचा पारा चढला

योगेश कदम यांचे हे उत्तर ऐकूण सुधीर मुनगंटीवार चांगलेच संतापले. ते म्हणाले, धान उत्पादक शेतकरी सर्वात गरीब शेतकरी असतो. अनुदानाची रक्कम वाढल्यामुळे निधीचा आकडा वाढला. धान विक्री होवो अथवा न होवो. पोर्टलमध्ये नोंदणी असलेल्या शेतकऱ्यांना बोनस मिळालेच पाहिजे. पण धानाचा बोनस देण्याची वेळ येते तेव्हा चर्चा व मंथन सुरू होते, हे योग्य नाही.विधानसभेत लक्षवेधी असली की उत्तर देण्यासाठी मंत्री महोदयांनी अभ्यास करून येण्याची गरज आहे. लक्षवेधीवर अशा प्रकारे उत्तर देणे हा संविधानाचा अपमान आहे. २५ डिसेंबर रोजी मुख्यमंत्र्यांनी आदेश दिल्यानंतरही अन्न व नागरी पुरवठा विभागाने या प्रकरणी कोणतीही तयारी केली नाही, असे सुधीर मुनगंटीवार म्हणाले.



**भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज विधानसभेत लक्षवेधीला उत्तर देण्याच्या मुद्यावरून अन्न व नागरी पुरवठा विभागाचे राज्यमंत्री योगेश कदम यांना अक्षरशः फैलावर घेतले. लक्षवेधीवर बोलताना मंत्र्यांनी अभ्यास करून यायला हवे. केवळ बघतो, बैठक लावतो, असे सांगून चालत नाही, असे ते या प्रकरणी मंत्री कदम यांचे कान टोचत म्हणाले.राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी आज राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस देण्याच्या मुद्यावर लक्षवेधी मांडण्यात आली. या प्रकरणी विरोधकांनी सरकारला धारेवर धरल्यानंतर त्यांना सत्ताधारी आमदारांचीही साथ मिळाली. यात भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सरकारला अक्षरशः सळो की पळो करून सोडले. त्यांनी लक्षवेधीला थातूर मातूर उत्तर देण्याच्या मुद्यावरून अन्न व नागरी पुरवठा मंत्री योगेश कदम यांना चांगलेच खडेबोल सुनावले. लक्षवेधीवर बोलताना मंत्र्यांनी अभ्यास करून यायला हवे. केवळ बघतो, बैठक लावतो असे बोलून चालत नाही, असे ते म्हणाले.**

**मुंबई (प्रतिनिधी)**–सुधीर मुनगंटीवार यांचा हा रोष पाहून योगेश कदम यांनी धान उत्पादकांना गत ३ वर्षांत देण्यात आलेल्या बोनसची आकडेवारी सभागृहाच्या पटलावर सादर केली. ते म्हणाले, २०२२-२३ मध्ये बोनस म्हणून आपण ८२३ कोटी रुपयांचा निधी खर्च केला होता. त्यानंतर २०२३-२४ मध्ये आपण १३७८ कोटी दिले. २०२४-२५ मध्ये १६२८ कोटींचा निधी यासाठी जारी करण्यात आला. नोंदणीकृत शेतकऱ्यांना ही रक्कम दिली जाते. पण ही रक्कम व धान खरेदीच्या गुणोत्तराचे प्रमाण याची फेरतपासणी होण्याची गरजेची आहे, असे कदम म्हणाले.

### मुख्यमंत्र्यांच्या आदेशाकडे साफ दुर्लक्ष

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, राज्यातील तब्बल ७ लाख शेतकरी धानाच्या बोनसच्या घोषणेची वाट पाहत आहेत. १५ डिसेंबर २०२५ रोजी मी धान उत्पादक शेतकऱ्यांना घेऊन मुख्यमंत्र्यांची भेट घेतली होती. तेव्हा त्यांनी या प्रकरणी तत्काळ कार्यवाहीचे आदेश दिले होते त्यामुळे जानेवारीत यासंबंधीचा जीआर निघेल अशी अपेक्षा होती. पण सुरुवातीला जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचे कारण पुढे करण्यात आले. ही निवडणूक संपली. त्यानंतरही बोनसचा जीआर निघाला नाही. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी २५ डिसेंबर रोजी स्पष्ट आदेश दिले असतानाही माननीय राज्यमंत्र्यांचा अन्न व नागरी पुरवठा विभाग अजूनही कुंभकर्णाचा बाप बनून झोपलेला आहे.ही अधिवेशनातील पहिलीच लक्षवेधी होती. अधिवेशनात पहिलाच निर्णय शेतकऱ्यांच्या हिताचा होणे अपेक्षित होते. राज्यमंत्र्यांकडून धान उत्पादकांच्या बोनसविषयी ठोस व नेमक्या उत्तराची अपेक्षा होती. पण ती फोल ठरली, असे ते म्हणाले.

# रावेर पोलिसांचा मोठा विजय ६७ सीसीटीव्ही तपासले, आणि केला लुटाऱ्यांचा पर्दाफाश

दैनिक वादळ वार्ता
**जळगाव | जितु इंगळे**

रावेर तालुक्यात खळबळ उडविणाऱ्या ८ लाख रुपयांच्या लूटप्रकरणाचा रावेर पोलीस स्टेशन गुन्हे शोध पथकाने यशस्वी पर्दाफाश केला आहे. अवघ्या काही दिवसांत ७ आरोपींना अटक करून पोलिसांनी तब्बल ३ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून या कारवाईमुळे परिसरात पोलिसांच्या कार्यक्षमतेबाबत समाधान व्यक्त होत आहे. बऱ्हाणपूर येथील मसाला व्यापारी दीपक सुरेश धर्मानी यांनी ६ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांचे कर्मचारी गौरव वाघ व तौफिक तेली यांना सावदा, फैजपूर व रावेर परिसरात वसुलीसाठी पाठवले होते. रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास खानापूर आरटीओ बॅरेलजवळ ८ ते ९ इसमांनी त्यांच्या दुचाकीला अडवून रोख रकमेची बॅग हिसकावून नेली. या घटनेमुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.या प्रकरणी ७ फेब्रुवारी २०२६ रोजी रावेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक डॉ. विशाल जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू करण्यात आला. घटनास्थळी सीसीटीव्ही नसतानाही पोलिसांनी हार न मानता रावेर, सावदा व



फैजपूर परिसरातील तब्बल ६७ सीसीटीव्ही फुटेज तपासले. तसेच सायबर विभागाच्या मदतीने तांत्रिक विश्लेषण करून आरोपींचा माग काढण्यात आला.गोपनीय माहितीच्या आधारे रावेर येथील बंडू चौक परिसरातून ७ संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात आले. सखोल चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.अटक आरोपी :फारुख शेख रईस (१९), अत्ताउल्लाह खान दाऊद खान उर्फ सोनू, शेख सईद शेख कादर उर्फ सुपडू, शेख समीर शेख कलीम उर्फ चिकू, राहील खान दाऊद खान, रहेमान खान अय्युब खान उर्फ भुऱ्या व अक्रम खान इस्माईल खान.आरोपींकडून २ लाख ५५ हजार रुपये रोख व ९५ हजार रुपये किमतीच्या दोन मोटारसायकली असा एकूण ३ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा मुख्य सूत्रधार शेख हसन शेख अफजल उर्फ हसन फावड्या हा सराईत गुन्हेगार असून तो सध्या फरार आहे. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विशेष पथके कार्यरत आहेत.न्यायालयाने अटक करण्यात आलेल्या आरोपींना २६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. ही कारवाई डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, उपअधीक्षक अनिल बडगुजर तसेच मा. श्री अण्णासाहेब घोलप, पोलीस उपअधीक्षक (चोपडा विभाग - अति. कार्यभार) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या यशस्वी कारवाईत पोलीस निरीक्षक डॉ. विशाल जयस्वाल, उपनिरीक्षक तुषार पाटील, गुन्हे शोध पथक व सायबर विभागातील अधिकारी-अंमलदारांनी मोलाचे योगदान दिले आहे. या धडाकेबाज कारवाईमुळे रावेर तालुक्यातील नागरिकांनी पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक केले आहे.

# नंदुरबार हादरले! ५५ वर्षीय महिलेवर अमानुष अत्याचार करून हत्या

## नराधम आरोपीला १२ तासांत बेड्या

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

नवापूर तालुक्यातील गंगापूर परिसरात एका ५५ वर्षीय महिलेवर अमानुषपणे लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली असतानाच, नंदुरबार पोलिसांनी अत्यंत तत्परता दाखवत मुख्य आरोपीला अवघ्या १२ तासांच्या आत अटक केली आहे. स्थानिक गुन्हे शाखा आणि विसरवाडी पोलिसांनी संयुक्तरीत्या ही मोठी कारवाई केली.दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळच्या सुमारास गंगापूर ते नानगीपाडा रस्त्यालगत असलेल्या एका शेतात ही हृदयद्रावक घटना घडली. नराधम आरोपीने महिलेवर केवळ अत्याचारच केला नाही, तर तिच्या गुप्तांगात गंभीर दुखापत करून तिची क्रूरपणे हत्या केली. गंभीर जखमी अवस्थेत ही महिला शेतात आढळून आली होती. नातेवाईकांनी तातडीने तिला रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारापूर्वीच



वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तिला मृत घोषित केले.या प्रकरणी विसरवाडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) आणि ६६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनेचे गांभीर्य ओळखून जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांनी तातडीने तपासाचे आदेश दिले. संशयित आरोपी मनिल छगन नाईक ऊर्फ टायबू (वय २३, रा. गंगापूर) हा घटनेनंतर गावातून फरार झाला होता. तो रेल्वेने पळून जाण्याच्या प्रयत्नात असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना मिळाली.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी चिंचपाडा आणि नवापूर रेल्वे स्थानक परिसरात सापळा रचला. आरोपी पळून जाण्याच्या बेतात असतानाच पोलिसांनी त्याला नवापूर रेल्वे स्थानक परिसरातून शिताफीने ताब्यात घेतले.

पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.यामध्ये पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोउपनि मुकेश पवार, विकास गुंजाळ व पथक.त्याचबरोबर
विसरवाडी पोलीस स्थानकाचे प्रभारी नरेंद्र साबळे, पोउपनि देविदास वडघुले व अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश आहे. अशा प्रकारच्या अमानुष गुन्ह्यातील आरोपीला कठोरात कठोर शिक्षा मिळावी, यासाठी पोलीस भक्कम पुरावे गोळा करत आहेत. १२ तासांच्या आत अटक केल्यामुळे गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा धाक निर्माण झाला आहे.

# बोरद आरोग्य केंद्राचा कायापालट! 'अमेरिकेयर्स इंडिया' च्या मदतीने आरोग्य सेवा आता अधिक 'हायटेक'

## रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा: सरपंच अनिता भिलावे यांच्या हस्ते विविध सुविधांचे लोकार्पण

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांना उत्तम दर्जाच्या आरोग्य सुविधा मिळाव्यात, या ध्येयाने प्रेरित होऊन अमेरिकेयर्स इंडिया फाउंडेशन आणि बोरद प्राथमिक आरोग्य केंद्राच्या टीमने एक आदर्श घालून दिला आहे. संस्थेच्या माध्यमातून आरोग्य केंद्रात मूलभूत सोयीसुविधांचे जाळे निर्माण करण्यात आले असून, यामुळे बोरद परिसरातील आरोग्य सेवेचा चेहरामोहरा बदलला आहे.अमेरिकेयर्स इंडिया फाउंडेशनने केवळ साहित्य दिले नाही, तर रुग्णांच्या गरजेचा विचार करून प्रत्येक गोष्ट बारकाईने पूर्ण केली आहे. आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांनी दाखवलेला उत्साह आणि पाठपुरावा यामुळेच आज या सुविधा प्रत्यक्ष रूपात पाहायला मिळत आहेत. आरोग्य केंद्रात प्रसूतीसाठी लागणारे अद्ययावत टेबल आणि सर्व आधुनिक साधनसामग्री उपलब्ध केल्याने माता-बाल संगोपन अधिक सुरक्षित झाले आहे.




**अमेरिकेयर्स इंडिया फाउंडेशनने दिलेले हे योगदान आणि आमच्या आरोग्य कर्मचाऱ्यांची सेवावृत्ती यामुळे बोरद आरोग्य केंद्र हे तालुक्यात एक मॉडेल म्हणून समोर येत आहे. –उपसरपंच संतोष ढोडरे बोरद ता. तळोदा.**

पिण्याच्या पाण्यासाठी 'वॉटर फिल्टर प्लांट' आणि संसर्गापासून बचावासाठी ठिकठिकाणी 'वॉश बेसिन'ची व्यवस्था करण्यात आली आहे.रुग्णांच्या सोयीसाठी सुसज्ज 'केस पेपर केबिन' आणि बायो-मेडिकल कचऱ्याच्या (सलाईन बॉटल, इंजेक्शन) योग्य विल्हेवाटीसाठी विशेष बांधकाम करून देण्यात आले आहे. दिनांक २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता एका उत्साही वातावरणात या सर्व साहित्याचे लोकार्पण करण्यात आले. बोरद गावाच्या लोकनियुक्त सरपंच अनिता भिलाव यांच्या हस्ते फित कापून या सुविधा रुग्णांसाठी खुल्या करण्यात आल्या. यावेळी बोलताना त्यांनी संस्थेच्या कार्याचे आणि आरोग्य विभागाच्या सतर्कतेचे कौतुक केले. यावेळी उपसरपंच संतोष ढोढरे, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र भिलाव यांच्यासह वैद्यकीय अधिकारी डॉ. कुंजप्रिया पावरा व सुधीरकुमार ठाकरे उपस्थित होते. आरोग्य यंत्रणेचा कणा असलेले कर्मचारी मनोज पिंजारी, रियाज देशमुख, मनीषा भामरे, सुनंदा वळवी, भरमसिंग पावरा, दीपक पावरा, दीपक बेहरे, विनोद वळवी, भारती भामरे, मनोज बैसाणे यांनी हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# जिल्हा परिषद माध्यमिक शाळेची जमीन वाचवण्यासाठी आमदार नमिता मुंदडा यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

केज येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेची जमीन अनुपयोगी ठरवून अन्य कारणांसाठी वापरण्याच्या हालचालींना विरोध करत आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर पत्र पाठवले आहे. शाळेचा वादग्रस्त ठराव तत्काळ रद्द करून शाळा पूर्ववत सुरू करण्यासाठी आवश्यक सुविधा व शिक्षक नियुक्ती करण्याची मागणी त्यांनी केली आहे.



आमदार मुंदडा यांनी पत्रात नमूद केले आहे की, केज येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सन १९५२ पासून कार्यरत असून हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण देत समाजातील विविध क्षेत्रांत अधिकारी, अभियंते, डॉक्टर, न्यायव्यवस्थेतील मानकरी तसेच विविध क्षेत्रांतील जबाबदार नागरिक घडवले आहेत. मात्र गेल्या काही वर्षांपासून शिक्षकांची कमतरता, आवश्यक सुविधा नसणे यामुळे शाळेची स्थिती खालावली असून विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. विशेष म्हणजे नगरपंचायतीकडून शाळेची एक एकर जागा अनुपयोगी असल्याचा ठराव करून ती अन्य कारणांसाठी वापरण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. शैक्षणिक वापरासाठी असलेली जागा इतर कारणांसाठी वळवणे हे विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणारे पाऊल ठरेल, असे आमदारांनी पत्रात स्पष्ट केले आहे. दि. २६ जानेवारी २०२६ रोजी ४०० हून अधिक माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन शाळेचे पुनरुज्जीवन करण्याचा निर्धार व्यक्त केला असून स्थानिक नागरिक, पालक व माजी विद्यार्थी शाळा पुन्हा सुरू करण्यासाठी आग्रही आहेत. यासाठी इमारत दुरुस्ती, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, वीज, कंपाऊंड वॉल आदी मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची तसेच पात्र शिक्षकांची नियमित नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे. केज शहराच्या शैक्षणिक व बौद्धिक जडणघडणीचा मजबूत पाया असलेल्या या संस्थेबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा पालक व नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होऊ शकतो, असा इशाराही पत्रातून देण्यात आला आहे. शाळेची जमीन शैक्षणिक कारणासाठी राखून ठेवून सर्व सुविधा उपलब्ध करून शाळा पूर्ववत सुरू करण्याची विनंती आमदार नमिता मुंदडा यांनी शासनाकडे केली आहे.

# ह्यात बदल कधी होणार ?



मला तर ठेवलंय कायम,
अडाणी भोळा,
अक्षरशत्रू म्हणुन कायमचा खुळा,
अंधश्रद्धेच्या भीतीने,
केलंय मनाने लुळा,
कोंबडे, बकरे, देऊन बळी,
म्हणे संकटे, व्याधी, पिडा टाळी,
नवसाने येते,
अपत्यासह झोळी.!

मला तर ठेवलाय कायमचा, अडाणी भोळा,
बिंबवलंय खोल मनावर,
बामन आला तोंडातून
क्षत्रिय अवतरला बाहुतून,
वैश आला मांडीतून,
अन राहिलेल्यांचा उगम झाला,
वरील सर्वांच्या सेवेसाठी,
अन तो ही तळपायातून. !

मग माय माझ्या,
माझं तेच अडाणी मन,
अडाणी मनालाच विचारू लागतं,
त्या महान सृष्टीकर्त्याने,
एकाच वेळी , लाखो, करोडो जीव निर्माण का केले नाही?
नर, नारीच्या समागमाशिवाय
अपत्य प्राप्ती का करता आली नाही?
मग त्याला प्रत्येक जिवाला जोडीदाराची निकड का वाटली?

मग हे कुणी भरवलं, मोकळ्या मठ्ठं, करून ठेवलेल्या डोक्यात?
होती मक्तेदारी शिक्षणाची,
फक्त ब्राह्मणांकडे,
स्वार्थासाठी त्यांनी,
पसरविले चहूकडे,
ब्राह्मणाची वाणी, तीच देववाणी
त्या भीतीपोटी
खोट्या, अकल्पित, कल्पना भरून
ठेवल्या बथ्थड केलेल्या मेंदूकडे.!

आता आपण एकविसाव्या,
विज्ञान युगात वावरतोय,
जगात झपाट्याने क्रांती होतेय,
मानव सूर्याकडे झेप घेऊ पाहतोय,
भ्रमणध्वनीने जगाला,
मुठीत घेतलंय,
जग नाना तर्हेने, अनेकानेक क्षेत्रात
विकसीत होऊन प्रगतीच्या मार्गाने चाललंय.!

आपण मात्र अध्याप ही वावरतोय,
त्याच मानसिकतेत,
आता ही तेहतीस कोटी देव ठाण मांडून बसलेय, आपल्याच
देशात, मुक्या प्राण्यांचे,
बळी दिले जाताहेत,
नवसासाठी केस मुंडण केलं जातंय,
पापक्षालनासाठी गंगेत,
डुबकी मारली जातेय,
वट सावित्रीला पूजन केलं जातंय,
ती मनात नवर्याला शिव्या, शाप देतेय की आणखी काही?
कुणास ठाऊक?
मातीचा गणपती दूध पितोय,
संकटं टळून, धन वृद्धी व्हावी,
म्हणुन हजारोंची दक्षिणा देऊन, मातीच्या नाग बळीची
पूजा केली जाते,
दासी देवाची, पण तिचा उपभोग सर्वच घेताय,
कावळा अन्नाला शिवल्या शिवाय,
मृतकाचे मन समाधानी होत नाही,
ह्यापेक्षा हास्यास्पद काय असू शकते.?.!
ह्यापेक्षा हास्यास्पद काय असू शकते.?!!
ह्यापेक्षा हास्यास्पद काय असु शकते?.!!!

–अरुण निकम,
९३२३२४९४८७.
मुंबई.

# आरोग्य योजनांचा लाभ नाकारणाऱ्या रुग्णालयांवर कठोर कारवाई करा-काँग्रेसचे विधिमंडळ नेते वडेट्टीवार

## कायद्यात बदल; योजना राबवणे आता बंधनकारक-मुख्यमंत्री फडणवीस यांची स्पष्टोक्ती

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

'आयुष्यमान भारत' आणि 'महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना' या शासकीय आरोग्य योजनांचा लाभ गरजू रुग्णांना नाकारण्याचा प्रकार काही खासगी रुग्णालयांकडून सुरू असल्याचा गंभीर मुद्दा विधानसभेत उपस्थित करण्यात आला. काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी अशा रुग्णालयांवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली.प्रश्नोत्तराच्या तासात बोलताना वडेट्टीवार यांनी चंद्रपूरसह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पात्र रुग्णांना योजनेंतर्गत उपचार नाकारले जात असल्याचे सांगितले. अनेक रुग्णालये योजनेंतर्गत सेवा देण्यास टाळाटाळ करतात किंवा रुग्णांकडून पैसे घेतल्याशिवाय उपचार देत नाहीत. सरकारने योजना सुरू केल्या असल्या तरी अंमलबजावणी प्रभावी नाही. प्रशासनामुळे गरिबांना प्रत्यक्ष लाभ मिळत नाही, अशी टीका त्यांनी केली.यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारने या प्रकरणाची



गंभीर दखल घेतल्याचे स्पष्ट केले. कायद्यात आवश्यक बदल करून संबंधित सर्व रुग्णालयांना या योजना राबवणे बंधनकारक करण्यात आले आहे. काही रुग्णालये रुग्णांना नाकारत असल्याची वस्तुस्थिती मान्य आहे; मात्र आता अशी टाळाटाळ सहन केली जाणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.राज्यातील एकूण ४७९ रुग्णालयांपैकी सध्या केवळ १३४ रुग्णालये या दोन्ही योजना एकत्रितपणे राबवत असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. उर्वरित रुग्णालयांनी न्यायालयात धाव घेतली होती; मात्र न्यायालयाकडून कोणतीही स्थगिती न मिळूनही काही रुग्णालये सहकार्य करत नव्हती, असेही त्यांनी नमूद केले.सरकारने कायद्यात बदल करून सर्व पात्र रुग्णालयांना शासनाच्या अखत्यारीत आणले असून, यापुढे योजना राबवणे अनिवार्य राहील. जे रुग्णालय नियमांचे उल्लंघन करतील, त्यांच्यावर कायद्यानुसार सुनावणी घेऊन कडक कारवाई केली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

# भारत-इंडोनेशिया संसदीय मैत्री समूहाच्या नेतृत्वाची जबाबदारी खा.श्रीकांत शिंदे यांना

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय मंचावर भारताचे प्रतिनिधित्व करणे ही नेहमीच अभिमानाची बाब असते. भारत-इंडोनेशिया नेतृत्वाची जबाबदारी सोपविण्यात आल्याबद्दल कल्याण लोकसभेचे शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी आपल्या एक्स पोस्टद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिरला तसेच संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू यांचे मनःपूर्वक आभार मानले. खासदार डॉ. शिंदे पुढे म्हणाले की हा माझ्यासाठी, माझ्या पक्षासाठी आणि महाराष्ट्रातील सर्व नागरिकांसाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. अशा मंचांमुळे भारताचे कूटनीतिक हित अधिक बळकट होतील तसेच आपल्या लोकशाही, संसदीय आणि जनतेतील परस्पर संबंधांना अधिक दृढता मिळेल.

प्रतिनिधीमंडळातील विविध राजकीय पक्षांच्या सर्व खासदारांसह एकत्रितपणे भारत आणि इंडोनेशिया यांच्यातील सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक भागीदारी अधिक मजबूत करण्यासाठी ते सक्रियपणे कार्य करतील. हा पुढाकार दोन्ही देशांमधील परस्पर सहकार्याला नवी गती देईल तसेच भारताची जागतिक उपस्थिती अधिक सक्षम करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. या मैत्री समूहांतर्गत खासदार शिंदे यांच्याकडे इंडोनेशियाशी संबंधित संसदीय मैत्री समूहाचे नेतृत्व सोपविण्यात आले आहे. ३९ वर्षीय श्रीकांत शिंदे हे या प्रतिनिधीमंडळातील सर्वात तरुण नेते असतील, जे आंतरराष्ट्रीय मंचावर भारताच्या नव्या आणि ऊर्जावान राजकीय पिढीचे प्रतिनिधित्व करतील.डॉ. श्रीकांत शिंदे हे शिवसेनेचे तीन वेळा निवडून आलेले युवा खासदार आणि संसदीय पक्षनेते आहेत. लोकसभेत महाराष्ट्राशी संबंधित प्रश्न प्रभावीपणे मांडण्यात ते सातत्याने सक्रिय राहिले आहेत. त्यांच्या याच क्षमतेवर आणि सक्रिय भूमिकेवर विश्वास ठेवून लोकसभा अध्यक्षांनी त्यांच्यावर पूर्ण विश्वास दर्शवत ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे.




# उरणमध्ये सुपर स्पेशालिटी डॉक्टरांची ओपीडी सुविधेचा शुभारंभ

## मेडिकव्हर हॉस्पिटल्सचा अनोखा उपक्रम; दर महिन्याला घेता येणार तज्ज्ञ डॉक्टरांच्या वैद्यकिय सेवेचा लाभ

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

उरण तसेच असपासचा परिसरातील नागरिकांसाठी नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटल्सच्या वतीने आता सुपर स्पेशालिटी डॉक्टरांची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे गंभीर आजारांवरील उपचारांसाठी नागरिकांना आता मुंबई किंवा इतर मोठ्या शहरांकडे धाव घेण्याची गरज भासणार नाही.या उपक्रमाअंतर्गत मूत्रविकार तसेच मूत्रपिंडाशी संबंधित आजारांवरील तज्ज्ञ डॉक्टरांच्या ओपीडीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नेफ्रॉलॉजी उपचारांसाठी इंटरव्हेन्शनल नेफ्रोलॉजिस्ट डॉ. अमर कुलकर्णी हे दर महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या शनिवारी दुपारी १२ ते २ या वेळेत उपलब्ध राहणार आहेत. ऑर्थोपेडिक्स व




स्पाइन सर्जन डॉ. अरविंद जे. वाटकर हे महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी दुपारी २ ते ४ यावेळेत उपलब्ध असतील.तसेच ऑर्थोपेडिक्स विभागाचे संचालक, रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट, स्पोर्ट्स इंज्युरी आणि ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. श्रवण कुमार पवार हे देखील दर महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी २ ते ४ या वेळेत रुग्णसेवेसाठी उपलब्ध असतील. युरोलॉजिस्ट डॉ. विकास भिसे हे दर महिन्याच्या बुधवारी दुपारी १२ ते २ या वेळेत उपलब्ध राहणार आहेत.रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट आणि ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. प्रमोद भोर हे दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी दुपारी २ ते ४ या वेळेत उपलब्ध राहणार आहेत. हृदयविकार तज्ज्ञ डॉ. तामरीउद्दीन धनावडे दर महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी दुपारी १२ ते २ या वेळेत उपलब्ध राहतील. दर महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी दुपारी १२ ते २ या वेळेत पोटविकार तज्ज्ञ डॉ. रावसाहेब राठोड यांच्या ओपीडीचा लाभघेता येईल.ही वैद्यकीय सेवा पालवी हॉस्पिटलमध्ये दुपारी १२.०० ते २.०० व दुपारी २ ते ४ या वेळेत उपलब्ध होणार आहे. याकरिता पूर्व नोंदणी आवश्यक असून गरजूंनी ८६५५८४५८६६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे.या उपक्रमामुळे उरण व परिसरातील नागरिकांना वेळीच तज्ज्ञ डॉक्टरांकडून सल्ला आणि उपचार घेण्याची संधी उपलब्ध होणार असून, आरोग्यसेवेच्या दृष्टीने हा उपक्रम एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# हार्बर लाइन जी.टी.बी. स्टेशन वरील लटकता जाहिरात फलक हटवा-दिलीप गाडेकर




**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

दिनांक २४ फेब्रुवारी २६ रोजी सायंकाळी पाच वाजता हरबर रेल्वे वरील गुरु तेही बहादूर नगर रेल्वे स्टेशन वरील प्लॅटफॉर्म नंबर दोन वर एका जाहिरात कंपनीचा फलक लटकता अवस्थेत दिसत आहे तो कोणाच्यातरी अंगावर डोक्यावर पडण्या अगोदर त्वरित काढून टाकावा व त्या जाहिरात कंपनी विरोधात कारवाई करावी अशी मागणी हॅपिनेस ज्येष्ठ नागरिक संघाचे प्रमुख दिलीप गाडेकर यांनी केली आहे. सदर बाब स्टेशन मास्तर कार्यालय यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. योग्य ती रेल्वे प्रशासनाने दखल घ्यावी अशी मागणी केली आहे. अन्यथा हा जाहिरात बोर्ड कोणाच्या अंगावर डोक्यावर पडल्यास जिवित हानी होऊ शकते.असे दिलीप गाडेकर यांनी म्हटले आहे.

# ठाणे मनपाच्या शिक्षण विभागाचा सांस्कृतिक महोत्सव जल्लोषात साजरा

## अभिनेता दत्तू मोरे यांनी उलगडला हास्यजत्रे पर्यंतचा प्रवास

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

मी स्वत: ठाणे महानगरपालिकेच्या शाळा क्र. १११ चा माजी विद्यार्थी असून शाळेत असताना याच मंचावरुन मला प्रथम क्रमाकांचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. शाळेच्या मंचावरुन सुरू झालेला हा प्रवास आज हास्यजत्राच्या मंचापर्यंत पोहचला आहे, त्यामुळे आज शाळेच्या व्यासपीठावरुन संवाद साधताना एक वेगळाच आनंद वाटत असल्याचे हास्यजत्रा फेम अभिनेता दत्तू मोरे यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी 'हास्यजत्रा' फेम अभिनेता म्हणून ओळख मिळेपर्यंत कसा झाला, याचा प्रेरणादायी प्रवास त्यांनी विद्यार्थ्यांसमोर उलगडला.ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे आयोजित मध्यवर्ती सांस्कृतिक महोत्सव २०२५-२०२६ हा आज दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी गडकरी रंगायतन येथे उत्साहात व जल्लोषात पार पडला. यावेळी उपमहापौर कृष्णा पाटील, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, उपआयुक्त उमेश बिरारी, उपआयुक्त (शिक्षण) मिताली संचेती, नगरसेवक मनोहर डुंबरे, शिक्षणाधिकारी शेषराव बडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण, दीपप्रज्वलन व नटराज पूजनाने झाली. या



सांस्कृतिक स्पर्धांमध्ये एकूण १०२ शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. इयत्ता १ ली ते ५ वी नृत्य विभाग, इयत्ता ६ वी ते ८ वी नृत्य विभाग तसेच इयत्ता १ ली ते ८ वी नाट्य विभाग अशा विभागनिहाय स्पर्धा दि. २३ व २४ डिसेंबर रोजी पार पडल्या होत्या. इयत्ता १ ली ते ५ वी नृत्य विभाग: शाळा क्र. ५३ - प्रथम क्रमांक, इयत्ता ६ वी ते ८ वी नृत्य विभाग: शाळा क्र. ५९ - प्रथम क्रमांक, नाट्य विभाग: शाळा क्र. ११ - प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून त्यांच्या कलागुणांना उत्तेजन देणारे मनोगत व्यक्त केले. मध्यवर्ती सांस्कृतिक महोत्सव समितीच्या अध्यक्षा सविता चौधरी, उपकार्याध्यक्षा नीलिमा पाटील, चिटणीस वर्षा मटकर, सहचिटणीस आशा पाटे, युआरसी प्रमुख रविंद्र पाटील, मुश्ताक पठाण व इतर पदाधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी शेषराव बडे व गटाधिकारी संगीता बामणे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केले. तसेच ठाणे जिल्हा शिक्षक सेनेचे अध्यक्ष सुनील फापाळे, ठाणे मनपा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष बाबाजी फापाळे, ठाणे जिल्हा शिक्षक पतपेढीचे संचालक जगन जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश पाटील व वनिता जाधव यांनी प्रभावीपणे केले.

# जल संवर्धनाच्या दिशेने संत निरंकारी मिशनचे दौंड येथे विशाल स्वच्छता अभियान संपन्न

## पुण्यात एकाच वेळी ४२ ठिकाणी जल स्वच्छता मोहीम संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**दौंड । प्रतिनिधी**

२२ फेब्रुवारी २०२६ : जेव्हा सेवा हीच साधना ठरते आणि निसर्गाविषयी संवेदनशीलता जीवनाचा मूलमंत्र बनते, तेव्हा समाजाला नवी दिशा देणारे पवित्र संकल्प जन्माला येतात. मानवसेवा व लोककल्याणाच्या या दिव्य भावनेला साकार रूप देत संत निरंकारी मिशनच्या वतीने 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचे आयोजन रविवार, २२ फेब्रुवारी २०२६, सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत, परम श्रद्धेय सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या पावन मार्गदर्शनाखाली संपूर्ण भारतभर एकाच वेळी राबविण्यात आले.

या अभियाना अंतर्गत पुणे जिल्ह्यातील इंद्रायणी, मुळा, मुठा, भीमा, भामा, घोडनदी, पवना, वेळू, कुकरी, मिना, कऱ्हा, मांडवी, आनंदी या नद्यांसह शहरातील विविध तलाव अशा ४२ ठिकाणी ही मोहीम राबविण्यात आली. या अभियानांतर्गत दौंड या ठिकाणी स्मशानभूमी , भीमा नदी काठ या ठिकाणी विशाल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.





संत निरंकारी मंडळाचे सचिव आदरणीय जोगिंदर सुखीजा यांनी माहिती देताना सांगितले की, हा विशाल उपक्रम देशभरातील १५०० हून अधिक ठिकाणी एकाच वेळी या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. पाणी हे केवळ एक साधन नसून जीवनाचा आधार आणि ईश्वराची अमूल्य देणगी आहे त्याचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे हि जागृती समाजामध्ये निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. संत निरंकारी मिशनने बाबा हरदेव सिंह जी यांच्या प्रेरणादायी शिकवणी आत्मसात करून सन २०२३ मध्ये संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने 'प्रोजेक्ट अमृत'ची सुरुवात केली होती. जलसंवर्धन हा उपक्रम केवळ एखाद्या दिवसापुरता किंवा मर्यादित मोहिमेपुरता न ठेवता, तो एक जीवनशैली, संस्कार आणि सेवाभाव म्हणून स्वीकारण्याची प्रेरणा बनेल – जिथे स्वच्छ जलातून स्वच्छ मन आणि स्वच्छ समाज घडू शकेल.

सतगुरु माताजींचा संदेश सदैव हाच राहिला आहे की, आपण ही पृथ्वी पुढील पिढ्यांसाठी अधिक सुंदर, स्वच्छ आणि संतुलित स्वरूपात जपून ठेवली पाहिजे. 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' हे अभियान त्या पवित्र संकल्पाचे मूर्त स्वरूप आहे, जे समाजाला निसर्ग, समाज व आत्म्याशी जोडून करुणा, समतोल आणि सौहार्दपूर्ण भविष्याच्या दिशेने पुढे नेण्याचे काम करेल.

स्वछता अभियान संपन्न झाल्यानंतर त्याच ठिकाणी विशाल सत्संग चे देखील आयोजन करण्यात आले होते . त्यामधून बाहेरील स्वच्छतेबरोबरच मनाच्या आंतरिक शुद्धीचा संदेश देण्यात आला. दौंड ब्रांच मुखी शिवाजी होले यांनी उपस्थित सर्व सेवादारांचे आभार व्यक्त केले.

# कळका ता.कंधार येथे अवकाळी पावसाने गारापडून रब्बी पिकांचे मोठे नुकसान








दैनिक वादळ वार्ता
**कंधार । प्रतिनिधी**

कंधार तालुक्यातील कळका येथे सोमवारी दि.२३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास झालेल्या अवकाळी पावसासह जोरदार वाऱ्यामुळे तसेच गारपिटीमुळे रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले. काढणीस आलेली ज्वारी, गहू, हरभरा, तूर व टरबूज ही पिके जमीनधोस्त झाली असून आंबे गळून पडली आहेत.गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण होते. सोमवारी अचानक आभाळ दाटून येत वारा सुटल्याने उभी पिके आडवी पडली. हरभऱ्याचे वाळलेले घाटे गळून पडले, तर गव्हाच्या ठुशीत पाणी शिरल्याने नुकसान वाढले. अनेक शेतकऱ्यांनी काढणी केलेल्या पिकांच्या खळ्यांनाही फटका बसला. हातातोंडाशी आलेला घास हिरावल्याने शेतकरी हवालदिल झाले असून प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून सरकारने चालू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात या नुकसानीची मदत तातडीने देण्यासाठी दोन्ही आमदारांनी करून शासनाच्या वतीने तहसीलदार, कृषी अधिकारी, महसूल अधिकारी (तलाठी),कृषी सहायक यांनी शेतकऱ्यांना शासकीय मदत मिळवून द्यावी अशी मागणी कळका ता.कंधार येथिल सर्व शेतकऱ्यांनी केली आहे.

# गोंडवाना विद्यापीठाच्या इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी अनुभवला वैरागडचा इतिहास

दैनिक वादळ वार्ता
**वैरागड । प्रतिनिधी**

ङऐतिहासिक वारसा संवर्धन: केवळ गरज नाही, तर कर्तव्यफ प्रा. प्रदीप बोडने यांचे प्रतिपादनगोंडवाना विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक इंग्रजी विभाग आणि आदिवासी अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मवैरागड: गोंडकालीन ऐतिहासिक वारसाफ या उपक्रमांतर्गत नुकतीच वैरागड किल्ल्यावर एक दिवसीय अभ्यास भेट आयोजित करण्यात आली होती. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी जिल्ह्याच्या वैभवशाली इतिहासाचे आणि गोंडकालीन स्थापत्यशास्त्राचे बारकावे प्रत्यक्ष अनुभवले.याप्रसंगी श्री. तुकाराम कनिष्ठ महाविद्यालय, कढोली येथील प्रा. प्रदीप बोडने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, १२ व्या शतकातील हत्तीगुंफा शिलालेखात ङवज्रगडफ असा उल्लेख आढळतो, ज्याचे अपभ्रंश होऊन पुढे ङवैरागडफ असे नाव पडले. हा किल्ला उत्तम



वास्तुकलेचे जिवंत उदाहरण आहे. मात्र, हा अमूल्य वारसा पुरातत्व विभागाकडून अजूनही पूर्णपणे संवर्धित झाला नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. ऐतिहासिक वास्तू आणि साहित्याचे संवर्धन करणे ही केवळ काळाची गरज नसून ते आपले नैतिक कर्तव्य आहे, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी या भेटीदरम्यान किल्ल्यावरील शिल्पकला, प्राचीन मंदिरे, तटबंदी आणि भौगोलिक रचनेचा अभ्यास केला. गडचिरोली जिल्ह्याला लाभलेला हा वारसा केवळ पर्यटन स्थळ नसून तो संशोधनाचा एक समृद्ध विषय आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना या उपक्रमातून झाली. तरुण पिढीने या वारशाच्या जतनासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता यावेळी अधोरेखित करण्यात आली. सदर अभ्यास भेटीसाठी इंग्रजी विभागाचे प्रा. विवेक जोशी, आदिवासी अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. वैभव मसराम, डॉ. प्रमोद जावरे तसेच पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवणी वाडी येथील शेतकर्यांच्या शेती पिकाचे वादळी वार्याने आतोनात नुकसान



दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील शिवणी लख वाडी येथील शेतकर्यांचे वादळी वारे व पावसाने,गहु .हरभरा,ज्वारी सह पिक जमिनीवर आडव होउन अतोनात नुकसान झाल आहे ,शेतकरी हा खरच संर्घष करत आपली शेती कसत असतो पण शेती कसत असताना याच कृषीप्रधान देशात शेतकर्याला अनेक अडचणीचा सामना करत आपली शेती कसावी लागत आहे ,शेतकर्यांना आपली शैती कसत असताना कधि अवकाळी पाउस तर कधी अल्प पाउस अन यातुनही पिक पिकउन खरेदीसाठी गेल असता शेतीमालाला कमी भाव मीळत असल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला असुन ,काल झालेल्या अवकाळी पावसात शिवणी लख व शिवणीवाडी येथील शेतकर्यांच्या पिकाच आतोनात नुकसान होउन ज्वारी गहु व हरभरा पिक वादळी वार्यामुळे जमिनीवर पीक पडल्याने शेतकरी चिंतातुर आहे व प्रशासनाने लवकरात लवकर पंचनामे करुन शेतकर्यांना नुकसान भरपाई दयावी अशी विनंती केली जातेय ,यावेळी काशिनाथ खुर्दे ,मोहन खुर्दे ,बाबुराव यजगर ,रमेश खुर्दे ,किसन खुर्दे ,

संजय खुर्दे,अंगद व्हरगळे गोपाल चौंडे, विठ्ठल खडके विश्वंभर खुर्दे , विलास खुर्दे सुनील खुर्दे , महादेव खुर्दे बालाजी खुर्दे , व्यंकट खुर्दे मारुती खुर्द ,, विकास कदम प्रभू खडके ,दत्तू खडके, राजेंद्र खडके ,सह शेतकरी उपस्थीत होते.

# औसा भुईकोट किल्लाला ११.२० कोटींचा ऐतिहासिक निधी; वारसा संवर्धनातून पर्यटन विकासाला वेग

## अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्याला यश

दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

ऐतिहासिक वारसा जपण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेत औसा भुईकोट किल्ल्याच्या जतन व दुरुस्ती कामासाठी ११ कोटी २० लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे औसा शहराच्या पर्यटन विकासाला नवी चालना मिळणार असून स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीलाही मोठा हातभार लागणार आहे.

नोव्हेंबर २०२५ मध्ये राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी औसा दौऱ्यादरम्यान किल्ल्याची प्रत्यक्ष पाहणी केली होती. किल्ल्याची सद्यस्थिती, तटबंदीवरील झीज, काही ऐतिहासिक वास्तूंची पडझड तसेच परिसराच्या सुशोभीकरणाची गरज यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. त्यावेळी किल्ल्याच्या सर्वांगीण संवर्धनासाठी विशेष



निधी देण्याची मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी केली होती. सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर शासनाने ११.२० कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी दिली आहे.

मंजूर निधीतून तटबंदीचे मजबुतीकरण, जीर्ण भागांचे संवर्धन, दरवाजे व महत्त्वाच्या वास्तूंची दुरुस्ती, खंदक परिसराची स्वच्छता आणि सुशोभीकरण, आकर्षक प्रकाशयोजना, माहिती फलक तसेच पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा उभारल्या जाणार आहेत. या कामांमुळे किल्ल्याचे ऐतिहासिक स्वरूप अबाधित राहील आणि पर्यटकांसाठी अधिक सुरक्षित व आकर्षक वातावरण निर्माण होईल.

सामरिक आणि स्थापत्यदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण असलेला औसा भुईकोट किल्ला खोलगट भागात वसलेला आहे. मजबूत तटबंदी, विस्तीर्ण खंदक आणि ऐतिहासिक वास्तू हे त्याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. बहामनी काळात उभारण्यात आलेल्या या किल्ल्याला पुढे निजामशाही, आदिलशाही आणि मोगल सत्तांमध्येही महत्त्व प्राप्त झाले होते. त्यामुळे या किल्ल्याचे ऐतिहासिक स्थान व्यापक स्वरूपाचे आहे.

राज्य शासनाच्या या निर्णयामुळे औसा शहराच्या विकासाला नवी दिशा मिळणार असून, मराठवाड्यातील एक महत्त्वाचे ऐतिहासिक पर्यटनस्थळ म्हणून औसाची ओळख अधिक भक्कम होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे

# दलाल वृत्तीच्या लोकाकडून लालची शेतकरी लागले गळाला,शेत शिवार लागला वनचक्कीमध्ये बदलायला; भविष्यामध्ये शेती व्यवसाय धोक्यात

दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यामध्ये सध्या मोठ्या प्रमाणात पवनचक्की उभारणीचे काम शेत शिवारामध्ये दिसून येत असून या पवन चकीमुळे भविष्यामध्ये शेती व्यवसायावर मोठा दुष्परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर हा व्यवसाय हा शेतीसाठी मारक ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही अशी जोरदार चर्चा सुरू झाली आहे. या पवन चक्कीमुळे शेतकऱ्यांना तुटपुंजा पैसा जरी असला तरी तो पैसा एकत्रितपणे जास्त येत असल्याने त्याचा दुरुपयोग आणि तो पैसा घेऊन शेतकरी आर्थिक संकटामध्ये सापडणार असल्याची ही चर्चा सध्या जोरदार सुरू आहे..

औसा तालुक्यामध्ये फत्तेपूर वाघोली दावतपूर शिवारात अनेक ठिकाणी पवनचक्क्यांची उभारणी झाली आहे तसेच तालुक्यातील किनी थॉट महादेव वाडी भादा या परिसरातही शेतकऱ्यांच्या जमिनी साठी करार करून पवन चक्क्या उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे यापूर्वी धाराशिव जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात पवनचक्क्यांची उभारणी झाली आहे धाराशिव जिल्ह्यातून पवनचक्क्याचे लोन आता लातूर जिल्ह्यामध्ये आले असून औसा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मध्यम हलक्या व भारी जमिनीमध्ये पवनचक्की उभारणीचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे भविष्याचा वेध घेता शेतकऱ्यांसोबत तीस वर्षाचा करार करून उभारणी करण्यात येत असलेल्या पवन ऊर्जा प्रकल्प मुळे शेती व्यवसाय धोक्यात येण्याची शक्यता आहे तसेच पवनचक्की च्या उभारणीमुळे पर्जन्यवृष्टीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही या प्रकल्पासाठी मोठ्या यंत्रसामुग्री व मोठ्या प्रमाणात जागा लागत आहे तसेच पवनचक्की च्या ठिकाणी येण्या जाण्यासाठी चा रस्ता यामध्येही जमिनी जात आहेत दिवसेंदिवस शेतकऱ्यांच्या जमिनी कमी होत असून लघु व मध्यम प्रकल्प साठवण तलाव सिंचन तलाव राष्ट्रीय महामार्ग शेत रस्ते शिवरस्ते एमआयडीसी गावागावातील प्लॉटिंग कारखाने व शैक्षणिक संकुलाची उभारणी इत्यादी साठी मोठ्या प्रमाणात शेतजमिनीचा वापर होत असल्यामुळे उपजावू जमिनी दिवसेंदिवस कमी होत आहेत त्यातच आता पवनचक्की प्रकल्पाची भर पडल्याने शेतकऱ्यांच्या जमिनी पवन ऊर्जा प्रकल्पामध्ये हे मोठ्या प्रमाणात जात असून शेतकऱ्यांना एकदाच मोठ्या प्रमाणात रक्कम मिळत असल्याचे लालच लागली असून पैशाच्या हव्यासापोटी अनेक शेतकरी आपल्या जमिनी पवन ऊर्जा प्रकल्पाला देत असून यामध्ये दलाली करणाऱ्यांचे हे उखळ पांढरे होत असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे पवन ऊर्जा प्रकल्प मुळे प्रदूषण सुद्धा निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात असून पशुपक्ष्यांची संख्या कमी होत आहे तसेच वृक्षतोड होत असल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून शेतकऱ्यांच्या दूरदृष्टीचा विचार केल्यास पवन ऊर्जा प्रकल्प तारक की मारक हे येणाऱ्या काळातच कळेल



# बीड जिल्ह्यातील बोर्ड परीक्षा: शिस्तीचा अतिरेक की शिक्षणव्यवस्थेचे अपयश?

## परीक्षेला ९०० पेक्षा अधिक विद्यार्थी गैरहजर का?

सध्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षा सुरू असताना बीड जिल्ह्यात प्रशासनाने कॉपीमुक्त वातावरणासाठी अभूतपूर्व कडक उपाययोजना राबवल्या आहेत. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या आदेशानुसार सर्व परीक्षा केंद्रे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली आणण्यात आली आहेत. यासोबतच ड्रोन कॅमेऱ्यांद्वारेही परीक्षा केंद्रांवर लक्ष ठेवले जात आहे. प्रत्येक वर्गातील पर्यवेक्षकांना मोबाईलवर झूम मीटिंग सुरू ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. केंद्राबाहेरून कॉपी पुरवली गेल्यास संबंधित वर्गातील शिक्षकांवर निलंबनाची कारवाई आणि नोटीस देण्याची भूमिका प्रशासनाने घेतली आहे. पोलीस बंदोबस्त, विविध विभागांची भरारी पथके आणि माध्यमांचे कॅमेरे या सर्वांनी मिळून परीक्षा केंद्रांचे वातावरण अत्यंत कडक आणि तणावपूर्ण झाले आहे. कॉपीमुक्त परीक्षा झाल्याच पाहिजेत या दुमत असण्याचे कारण नाही. या परीक्षांमध्ये काही प्रमाणात काही परीक्षा केंद्रावर कॉप्यांचा सुळसुळाट सुद्धा पाहायला मिळतो. ते रोखणे संबंधित केंद्रप्रमुख आणि तेथील कर्मचाऱ्यांची जबाबदारी आहे त्यासोबतच पालकांची सुद्धा मोठी जबाबदारी आहे.



दिनकर शिंदे
जिल्हाध्यक्ष – डिजिटल मीडिया परिषद जिल्हा बीड
मोबाईल– ७३८५३९४२६०

**सर्व यंत्रणा 'परीक्षा मोड'मध्ये**

या दोन महिन्यांच्या परीक्षाकालावधीत महसूल विभागातील तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी, शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, तसेच पंचायत समितीचे कर्मचारी यांना भरारी पथकांत नियुक्त करण्यात आले आहे. प्रशासनाची ही व्यापक हालचाल कॉपी रोखण्याच्या उद्देशाने असली तरी, प्रश्न असा उपस्थित होतो की हीच यंत्रणा वर्षभर शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी कितपत सक्रिय होती?

**तणावमुक्त की तणावग्रस्त?**

परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा. मात्र सध्याच्या परिस्थितीत परीक्षा केंद्रांवर काहीतरी गंभीर गुन्हा घडतो आहे अशीच भावना निर्माण होत असल्याचे पालक आणि विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया सूचित करतात. कॅमेऱ्यांची नजर, ड्रोनची उडान, सततची ऑनलाइन निगराणी या सगळ्यामुळे अभ्यासू विद्यार्थ्यांवरही अनावश्यक मानसिक दडपण येत असल्याची चर्चा आहे. वर्गावर गार्डिंग करणारे शिक्षकसुद्धा तणावाखाली असल्याचे दिसते.

विशेष म्हणजे, जिल्ह्यातील दहावी बोर्ड परीक्षेला सुमारे ९०० पेक्षा अधिक विद्यार्थी गैरहजर असल्याची बाब चिंताजनक आहे. या विद्यार्थ्यांनी परीक्षेकडे पाठ का फिरवली? भीती, अपुरी तयारी,



मानसिक ताण की इतर सामाजिक-आर्थिक कारणे-याचा सखोल शोध घेणे अत्यावश्यक आहे.

**मूलभूत सुविधांचा प्रश्न अनुत्तरित**

बीड जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये अद्यापही मूलभूत सुविधा अपुऱ्या आहेत. काही ठिकाणी वीजपुरवठा नाही, विद्यार्थ्यांसाठी बसण्याची व्यवस्थित व्यवस्था नाही, शाळेकडे जाण्यासाठी रस्त्यांचीही दुरवस्था आहे. ग्रामीण आणि शहरी शाळांमध्ये सुविधांची दरी स्पष्ट दिसते. अनेक शिक्षक पदे सेवानिवृत्तीनंतर रिक्त आहेत; नवीन भरती होत नसल्याने विद्यार्थ्यांना सर्व विषयांचे नियमित अध्यापन मिळत नाही. अशा स्थितीत परीक्षा काळात कठोर नियंत्रण ठेवण्यापेक्षा वर्षभरात शैक्षणिक गुणवत्ता आणि पायाभूत सुविधा सुधारण्यावर भर देणे अधिक परिणामकारक ठरले असते, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**मराठी शाळांचा अस्तित्वाचा प्रश्न**

खाजगी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मिळणाऱ्या वाढत्या प्रोत्साहनामुळे मराठी शाळा बंद पडण्याच्या उंबरठ्यावर आहेत. शासनाच्या शाळांना आवश्यक सुविधा, शिक्षक भरती आणि शैक्षणिक साधनसामग्री वेळेवर उपलब्ध झाली असती तर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असता. परीक्षा काळात कडक कारवाईपेक्षा वर्षभर सकारात्मक शैक्षणिक हस्तक्षेप अधिक परिणामकारक ठरला असता, अशी भावना व्यक्त होते.

**स्पर्धा परीक्षांवरील परिणाम?**

दहावी-बारावीच्या अनेक विद्यार्थी पुढे जेईई, नीट आणि सीईटी सारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत. सध्याच्या तणावपूर्ण वातावरणाचा त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर काय परिणाम होईल, याचाही विचार होणे आवश्यक आहे. आरोग्य विभागाने विद्यार्थ्यांच्या मानसिक स्थितीबाबत समुपदेशन आणि आवश्यक तपासण्या केल्या पाहिजेत, अशी मागणीही पुढे येत आहे.

**जबाबदारीची दिशा**

कॉपी रोखणे आणि परीक्षा पारदर्शक ठेवणे ही प्रशासनाची जबाबदारीच आहे. परंतु शिस्तीचा अतिरेक विद्यार्थ्यांच्या मनावर दडपण निर्माण करत असेल, तर त्या धोरणाचा पुनर्विचार होणे गरजेचे आहे. शिक्षण हा केवळ परीक्षा-केंद्रित विषय नसून वर्षभराच्या गुणवत्तापूर्ण अध्यापनाचा परिणाम असतो. आज प्रश्न केवळ सीसीटीव्ही, ड्रोन किंवा भरारी पथकांचा नाही; प्रश्न आहे शिक्षणव्यवस्थेच्या सर्वांगीण सुधारणेचा. ९०० हून अधिक विद्यार्थी गैरहजर राहणे ही केवळ आकडेवारी नाही, तर शिक्षणप्रणालीसमोरील गंभीर इशारा आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी जिथे रहमान, शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील आणि संबंधित विभागांनी या संपूर्ण परिस्थितीचे आत्मपरीक्षण करून शिक्षणाचा दर्जा, मूलभूत सुविधा, शिक्षक भरती, विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य या सर्व घटकांवर ठोस कृती आराखडा जाहीर करणे हीच काळाची गरज आहे. परीक्षा शिस्तबद्ध असाव्यात, पण त्या विद्यार्थ्यांसाठी भयाचे केंद्र न बनता आत्मविश्वासाचे व्यासपीठ ठराव्यात, हीच अपेक्षा.

# नंदुरबारमध्ये 'नंदिनी महोत्सवा'चा दिमाखदार प्रारंभ
## ग्रामीण महिलांच्या कौशल्याला मिळणार हक्काची बाजारपेठ

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

ग्रामीण भागातील महिलांच्या उपजत कलागुणांना आणि त्यांच्या कष्टाला व्यावसायिक ओळख मिळवून देणाऱ्या 'मिनीसरस नंदिनी महोत्सव २०२६' चे उद्घाटन दिनांक २५ रोजी खासदार गोवाल पाडवी यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. २५ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत चालणाऱ्या या महोत्सवातून बचत गटांच्या सक्षमीकरणाचा नवा अध्याय सुरू झाला आहे.

या महोत्सवतील ठळक बाबी

कालावधी: २५ फेब्रुवारी ते ०१ मार्च २०२६ (सकाळी १० ते रात्री १०).

सहभाग: ८० वस्तूंचे स्टॉल आणि २० चविष्ट खाद्य स्टॉल्स.

स्थळ: छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर परिसर, नंदुरबार.



उलाढाल उद्दिष्ट: ५० लाख रुपये.

उद्घाटनप्रसंगी बोलताना खासदार पाडवी म्हणाले की, नंदिनी महोत्सव हा केवळ वस्तूंच्या विक्रीचा मेळावा नसून तो ग्रामीण महिलांच्या आत्मसन्मानाचे दर्शन आहे. 'उमेद' अभियानामुळे जिल्ह्यातील १ लाख ९० हजार कुटुंबे आज स्वावलंबी झाली आहेत. केंद्र व राज्य सरकारमार्फत जिल्ह्यासाठी २० कोटी रुपयांचा 'उमेद मॉल' उभारण्याचे नियोजन असून, याद्वारे महिलांच्या उत्पादनांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाईल.जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी सांगितले की, बचत गटांना केवळ उत्पादनापुरते मर्यादित न ठेवता त्यांच्या उत्पादनांचे ब्रँडिंग आणि पॅकेजिंग करण्यावर भर दिला जात आहे. महिलांना वर्षभर उत्पन्नाचे साधन मिळावे यासाठी जिल्ह्यात 'कॅफे कम मार्ट' सुरू करण्याचे नियोजन प्रशासन करत आहे.यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांनी माहिती दिली की: जिल्ह्यातील १ लाख महिलांनी 'लखपती दीदी' बनण्याचे लक्ष्य पूर्ण केले आहे. स्थानिक सुनंदा पाडवी यांच्या मोहाच्या लाडूंना पुण्यातील कंपनीकडून ४ लाख रुपयांची मोठी ऑर्डर मिळाली आहे, जे जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे. जिल्ह्यात १९,७०८ बचत गटांनी ५०० कोटींचे बँक कर्ज घेतले असून, त्याची परतफेड ९७% इतकी अचूक आहे. मागील वर्षी २५ लाखांची उलाढाल झाली होती, यंदा ती ५० लाखांच्या पार नेण्याचे उद्दिष्ट आहे. शुद्ध, घरगुती आणि भेसळमुक्त उत्पादने खरेदी करण्यासाठी तसेच स्थानिक अस्सल चवीच्या पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी नंदुरबारकरांनी मोठ्या संख्येने या महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# आरोग्य मंत्र्यांच्या हस्ते मुंबईत सन्मान; धडगाव तालुक्यासाठी अभिमानास्पद कामगिरी



दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी । मोलगी**

आरोग्य क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट आणि उल्लेखनीय कार्याची दखल घेत धडगावचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कांतीलाल पावरा यांना आज दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई येथे राज्यस्तरीय सन्मान व पुरस्काराने गौरवण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे माननीय आरोग्य मंत्री यांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.डॉ. पावरा यांनी दुर्गम अशा धडगाव तालुक्यात आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. प्रामुख्याने माता-बाल संगोपन, लसीकरण मोहीम आणि ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीची सेवा मिळवून देण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या या निष्ठेची आणि प्रशासकीय कौशल्याची दखल घेत राज्य शासनाकडून त्यांना या विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.हा सन्मान केवळ डॉ. पावरा यांचा नसून संपूर्ण धडगाव तालुका व जिल्ह्यासाठी अभिमानास्पद मानला जात आहे. दुर्गम भागात काम करणाऱ्या अधिकाऱ्याचा राज्य पातळीवर गौरव झाल्यामुळे आरोग्य विभागातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.प्रतिक्रिया: हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून माझ्या संपूर्ण आरोग्य पथकाचा आणि धडगाव तालुक्यातील जनतेचा सन्मान आहे.यामुळे भविष्यात अधिक जमाने काम करण्याची प्रेरणा मिळेल.

# संतोष पांडागळे यांना सुधाकरराव डोईफोडे पत्रकारिता पुरस्कार



दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

दैनिक सत्य प्रभाचे संपादक तसेच डॉ. शंकरराव चव्हाण शारदा धंवर्धिनी पतसंस्थेचे विद्यमान संचालक संतोष पांडागळे यांना पत्रकारिता क्षेत्रातील मानाचा समजला जाणारा सुधाकरराव डोईफोडे पत्रकारिता पुरस्कार प्रदान करण्यात आला. सत्यप्रभाचे संपादक संतोष पांडागळे हे एक बहूआयमी व्यक्तिमत्व आहे. शिक्षण, राजकारण व समाजसेवा या क्षेत्रात त्यांचा सखोल अभ्यास आहे. कोणत्याही प्रश्नाची उकल सर सोप्या पद्धतीने काढतात. गोर गरिबांच्या समस्या सोडवण्यात ते नेहमीच अग्रेसर असतात आज नावारूपास आलेल्या दैनिक सत्य प्रभाच्या यशात संतोष पांडागळे यांचा सिहाचा वाटा आहे. डॉ. शंकराव चव्हाण शारदा धनवर्धिनी पाथसंस्थेच्या झालेल्या निवडणुकीत ते सर्वाधिक मतांनी विजयी झालेले उमेदवार आहेत. हाती घेतलेल प्रत्येक काम यशस्वी करण्याचा सरांचा हातखंड आहे. पत्रकारिता क्षेत्रातील उत्कृष्ठ कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# मातोश्री रमाबाई भीमराव आंबेडकर सामाजिक सेवाभावी संस्थेचे धम्म सारथी पुरस्कार जाहीर

## प्रा.डॉ.भीमराव माळगे, ॲड.मिलिंद कांबळे व भीमराव दिपके पुरस्काराचे मानकरी

दैनिक वादळ वार्ता
**मुखेड । प्रतिनिधी**

मुखेड तालुक्यातील मौजे बेटमोगरा येथील आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते कालकथीत दत्ता गंगाराम सोनकांबळे बेटमोगरेकर (मुगावकर) यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित शनिवार दि.१४ फेब्रुवारी २०२६ रोजी मौजे बेटमोगरा येथे भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा मुखेडच्या वतीने सुचित केलेल्या संस्कारानुसार आयोजित करण्यात आलेल्या अभिवादनपर कार्यक्रमात सामाजिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले असून सदर कार्यक्रमात प्रा.डॉ.भीमराव माळगे, ड.मिलिंद कांबळे व भीमराव दिपके यांना धम्मसारथी पुरस्कार जाहीर करण्यात आला.मातोश्री रमाबाई भीमराव आंबेडकर सामाजिक सेवाभावी संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष प्रकाश सोनकांबळे व सचिव तथा पत्रकारिता क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व संपादक भारत सोनकांबळे बेटमोगरेकर यांच्या संकल्पनेतून त्यांचे दिवंगत पिता फुले-शाहू-आंबेडकर चळवळीतील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते कालवश दत्ता गंगाराम सोनकांबळे यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त गेल्या तीन वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून या निमित्ताने सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नामवंत व्यक्तिंना धम्मसारथी हा पुरस्कार देण्यात येतो. त्या अनुषंगाने फुले- शाहू-आंबेडकर चळवळीत उल्लेखनीय कार्य करणारे देगलूर येथील प्रा.डॉ.भीमराव माळगे, त्याचबरोबर मुखेड तालुक्यातील येवती गावचे रहिवाशी सद्या मुखेड शहरातील शाहु नगर भागात वास्तव्यास असलेले ड. मिलींद कांबळे तसेच भीमराव दिपके (सुंडगीकर) यांना



प्रा.डॉ.भीमराव माळगे — ॲड.मिलींद कांबळे (पत्रकार) — प्रा.भीमराव दिपके

धम्मसारथी हा पुरस्कार जाहीर करण्यात आला असून २७ मे २०२६ रोजी त्यागमुर्ती माता रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त शाल, फेटा, सन्मानपत्र, स्मृती चिन्ह व महापुरुषांच्या विचारांचे पुस्तक गौरविण्यात येणार असल्याची माहिती मातोश्री रमाबाई भीमराव आंबेडकर सामाजिक सेवाभावी संस्था मौजे बेटमोगरा या संस्थेचे सचिव तथा संपादक भारत सोनकांबळे बेटमोगरेकर यांनी प्रसारमाध्यमांना दिली.

यावेळी रिपब्लिकन सेनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष अनिल सिरसे, भिमसेनेचे तालुकाध्यक्ष आकाश कांबळे, राष्ट्रीय रत्न पुरस्कार प्राप्त डॉ.राहुल कांबळे, सतीश कांबळे बावलगावकर, भीम धाडस सामाजिक संघटनेचे संस्थापक कपिल गोणारकर मातोश्री रमाबाई भीमराव आंबेडकर सामाजिक सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष - प्रकाश सोनकांबळे, निवृत्ती पोटफोडे, सुरेश सोनकांबळे, ज्ञानेश्वर सोनकांबळे, गौतम सोनकांबळे,भगवान सोनकांबळे, प्रीतम सोनकांबळे, संस्थेचे सचिव तथा संपादक भारत सोनकांबळे बेटमोगरेकर, यशवंत सोनकांबळे, हरी कांबळे, रामजी सोनकांबळे, यांच्यासह उपासिका सागरबाई सोनकांबळे, शांताबाई सोनकांबळे, मंगलताई सोनकांबळे, प्रेमला सोनकांबळे कमजळगेकर, चंदरबाई गायकवाड, तुळसाबाई कांबळे, जनाबाई कांबळे, सजाबाई सोनकांबळे, कमलबाई सोनकांबळे, जयश्रीबाई सोनकांबळे, महानंदा सोनकांबळे, भाग्यश्री सोनकांबळे, चतुरा सोनकांबळे, श्वेताताई सोनकांबळे, गंगासागर सोनकांबळे, हर्षदीप सोनकांबळे, दीक्षा सोनकांबळे, संघर्ष सोनकांबळे, सिद्धार्थ सोनकांबळे यांच्यासह बौद्ध उपासक उपासिका व गावातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077